बुद्धिमत्ता म्हणजे माहितीचे योग्य वापर करणे.

दैनिक **लोकक्रांतीचा आरंभ**

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | रविवार २९ जून २०२५ | अंक १९२० पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु







# पुन्हा मराठा आंदोलनाचा हुंकार; आज राज्यव्यापी बैठक; अंतरवाली सराटीत मोठ्या घडामोडी

राज्यात सध्या हिंदी सक्तीचा मुद्दा विरोधकांच्या अजेंड्यावर आहे. 5 जुलै रोजी मुंबईतील मोर्चासाठी तयारी सुरू असताना मुंबापुरीपासून कित्येक किलोमीटरवरील अंतरवाली सराटीत पुन्हा आंदोलनाचे वारे घुमू लागले आहे. आज अंतरवाली सराटीत मराठा आरक्षणाविषयी बैठक होत आहे. त्यामुळे सरकारचा ताप दुपट्टीने वाढण्याची शक्यता आहे. भाषिक मुद्यासोबतच ओबीसी आरक्षणावरून रान पेटण्याची शक्यता आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वीच राज्यात मोठ्या घडामोडींना वेग आला आहे.अंतरवाली सराटीत बैठकमराठा आरक्षण आंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी आज अंतरवाली सराटी मध्ये राज्यव्यापी बैठक होत आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील



यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये मराठा समाज बांधवांची आज दुपारी बारा वाजता बैठक पार पडणार आहे. प्रत्येक जिल्ह्यातून मोठ्या संख्येने मराठा समाज बांधव आजच्या बैठकीला येणार आहेत. गेल्या काही दिवसांपासून या बैठकीची तयारी सुरु होती. विविध जिल्ह्यात या बैठकीसाठी अगोदर तयारी करण्यात आली होती.काय आहेत मागण्या?मराठा समाजाला ओबीसी आरक्षण मिळावे ही प्रमुख मागणी आहे. मराठा आणि कुणबी एकच असल्याचे गॅझेट लागू करण्याची मागणी करण्यात येत आहे. सगे-सोयरेची अंमलबजावणी, मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेणे, तर जीव गमावलेल्या आंदोलकांच्या कुटुंबांना मदत तसचे कोपर्डी प्रकरणातील आरोपींना फाशीची शिक्षा या प्रमुख मागण्यांवर समाज ठाम आहे. यापूर्वी जरांगे पाटील यांनी सरकारला निर्णय घेण्यासाठी मुदत दिली होती. 29 ऑगस्ट 2025 रोजी मुंबईत मोठे आंदोलन छेडले जाईल, असा इशारा दिला होता. त्यामुळे आजच्या बैठकीला महत्त्व आले आहे. पुढील आंदोलनाची दिशा आजच्या बैठकीतून समोर येईल.

## आंदोलनाची पुढील दिशा काय?

मराठा आरक्षण आंदोलनाची पुढील दिशा ठरविण्यासाठी आज मनोज जरांगे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये दुपारी बारा वाजता आंतरवालीत मराठा समाज बांधवांची राज्यव्यापी निर्णायक बैठक पार पडणार आहे. राज्यातल्या प्रत्येक जिल्ह्यातून मोठ्या संख्येने मराठा समाज बांधव या बैठकीला उपस्थित राहणार असून आजच्या बैठकीत पुढची दिशा काय ठरते आणि काय भूमिका जरांगे पाटील घेणार आहे याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# जिल्ह्यातील खाजगी क्लासेस बंद करा

## उमाकिरण प्रकरणाने जिल्हा बदनाम,१ जुलैं रोजी धरणे आंदोलन

बीड । खाजगी क्लासेसच्या नावाखाली शहरात सुरू असलेले घाणेरडे प्रकार संताप जनक असून जिल्हाभरात खाजगी क्लासेस मोठ्या प्रमाणात चालत आहेत. या क्लासेसमध्ये विद्यार्थ्यांना शिकवण देणारे शिक्षक यांचे चरित्र प्रमाणपत्र तपासणे आवश्यक झाले असून शहरातील उमाकिरण शैक्षणिक संकुल मधील घडलेल्या प्रकारामुळे पालक वर्गात संताप व्यक्त करण्यात येत असून जिल्हाभरात सुरू असलेले खाजगी क्लासेस बंद करण्याची मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या राज्य महिला उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी केली आहे.



## १५ वर्षांपासून कामगार किमान वेतनापासून वंचित
## जिल्हाधिकारी यांनी घ्यावी दखल : जोगदंड

बीड।प्रतिनिधी बीड जिल्ह्यातील सर्व मुख्याधिकारी नगरपरिषद/ नगरपंचायत आस्थापनेतील घनकचरा व्यवस्थापनातील किमान वेतनाला पाय फुटले असून, जिल्ह्यात १५ वर्षांपासून कंत्राटी कामगार किमान वेतना पासून वंचित असल्याने येथील किमान वेतन गेले कुठे. असा प्रश्न कामगार नेते भाई गौतम आगळे सर यांनी उपस्थित केला आहे. या प्रकरणी जिल्हाधिकारी यांनी गांभीर्यपूर्वक दखल घेऊन पाय फुटलेल्या किमान वेतनाची चौकशी करून जिल्यातील मागील सर्व किमान वेतनातील फरका सह यापुढे नियमित किमान वेतन कायद्यानुसार वेतन, व इतर सोयी सवलती अदा करण्यात यावीत. अन्यथा यासाठी कामगारांना सोबत घेऊन अर्ध नग्न आंदोलन दिनांक ३० जून २०२५ रोजी करण्यात येईल, असा इशारा रोजंदारी मजदुर सेना केंद्रीय महासचिव भाई गौतम आगळे सर यांनी दिला आहे. या प्रसिध्दिस दिलेल्या पत्रकात मराठवाडा अध्यक्ष तथा कामगार प्रतिनिधी भाई राजेशकुमार जोगदंड यांनी म्हटले की, बीड जिल्ह्यातील नगरपरिषद /नगरपंचायत आस्थापनेतील कामगार पुरवठा करणारे कंत्राटदार / एजन्सी कंत्राटी कामगारांना मागील १५ वर्षांपासून किमान वेतन कायद्यानुसार वेतन देत नाहीत, बाकी सोयी सवलती सुद्धा गायप होत असून, ते कुठे जात आहेत हे कंत्राटी कामगारांना आजतागायत माहितच होत नाही.



बीड तालुक्यातील यशवंत विद्यालय कुर्ला येथे राजश्री शाहु महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी मुख्याध्यापक अभिषेक राऊत, सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या अध्यक्षांकडून कामकाजाचा आढावा

## महामंडळ अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी केली नियोजित उपविभागीय कार्यालयाच्या जागेची पाहणी

बीड, दिनांक २८ : अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांनी आज बीडच्या जालना रोड येथे होत असलेल्या महामंडळाच्या उपविभागीय कार्यालयाच्या जागेची पाहणी केली. यासह याठिकाणी महामंडळाच्या कामकाजाचा सविस्तर आढावाही घेतला.मराठवाड्यातील महामंडळाचे सर्व जिल्हा समन्वयक, संबंधित कर्मचारी उपस्थित होते. मराठवाडा विभागातील हे कार्यालय सुसज्ज आणि अद्ययावत असणार आहे. पात्र लाभार्थ्यांना या ठिकाणी महामंडळाकडून देण्यात येणाऱ्या सर्व सुविधा येथे उपलब्ध असतील. या उपविभागीय कार्यालयामुळे मराठवाड्यातील लाभार्थी यांचा वेळ वाचेल. अधिकाधिक लाभार्थी यांना महामंडळाच्या योजनांचा लाभ देण्यासही लाभार्थी व महामंडळ यांना सोयीचे होईल. तालुकास्तरावर देखील महामंडळाच्या योजना पोहोचविण्यासाठी आगामी काळात दौरे करण्यात येणार असल्याचे पाटील म्हणाले.



## बेलखंडी पाटोदा विद्यालयाच्या वतीने वारकऱ्यांना छत्र्या, रेनकोट वाटप



श्रीक्षेत्र संस्थान नारायणगडाचा पायी दिंडी सोहळा पंढरपूरकडे प्रस्थान झाला. दिंडीतील वारकऱ्यांना बेलखंडी पाटोदा विद्यालयाच्या वतीने रेनकोट आणि छत्र्या वाटप करण्यात आल्या. गुरूवार दि.२६ रोजी बेलखंडी पाटोदा येथे श्री क्षेत्र नारायण गडाच्या पायी दिंडी सोहळ्याचे आगमन होताच प्राचार्य धनवंत मस्के यांनी दिंडी सोहळ्याचे पुष्पहार अर्पण करून यथोचित असे स्वागत केले तसेच येणाऱ्या भाविक भक्तांना पावसाळी वातावरणामध्ये त्रास होऊ नये, म्हणून छत्र्या आणि रेनकोट वाटप करून दिंडीतील सर्व वारकऱ्यांना चहा पाण्याची व्यवस्था करण्यात आली. यावेळी शाळेचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व परिसरातील ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

## अंतरवाली येथे बैठकीसाठी जाणाऱ्या मराठा बांधवासाठी आनंद काळे यांच्या वतीने खिचडी वाटपाचे आयोजन

# जातीपातीच्या पलीकडे समाजकार्य करणारा युवक– आनंद काळे

## जरांगे पाटलाच्या प्रत्येकआंदोलनासाठी खिचडी, पाणी , गाड्याची केली होती व्यवस्था

वडवणी बीड प्रतिनिधी अंकुश गवळी

अंतरवाली सराटी येथे मराठा समाजाच्या आरक्षणसाठी संघर्ष योद्धा मनोज सारंगे पाटील यांनी निर्णय बैठकीचे आयोजन दि.२९/६/२०२५ रोजी रविवारी या दिवशी आंतरवाली सराटी होते आयोजन करण्यात आले आहे या बैठकीला जाण्यासाठी केव्हा गावातून मराठा बांधव जाणार आहे त्यांच्या सकाळी नाश्त्याची व पाण्याची व्यवस्था ओबीसी समाजाचे युवा नेते मराठा समाजाच्या प्रत्येक आंदोलनात समाज कार्य करणारे आनंद भैय्या काळे व मित्र मंडळ च्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक वडवणी येथे खिचडी व पाणी वाटपाचे आयोजन करण्यात आले होते तरी महा बैठकीसाठी जाणाऱ्या सर्व मराठा बांधवाने नाश्ता करूनच पुढे जावे असे आवाहन आनंद भैय्या काळे यांनी केले आहे.

मराठा समाजाला सरसकट ओबीसीतील आरक्षण मिळावे यासाठी गेल्या दोन वर्षापासून संघर्ष होता म्हणून तरंगे पाटील हे वेळोवेळी आंदोलन करत आहेत मात्र शासनाने त्याची दखल न घेतल्यामुळे २९ ऑगस्टला मुंबई आंदोलन करण्यात येईल असा इशारा दिला आहे त्यामुळे मोर्चाचे नियोजन करण्यासाठी दिनांक २९ जून रोजी अंतरवाली सराटी येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे या बैठकीसाठी संबंध वडवणी तालुक्यातून मोठ्या प्रमाणावर मराठा युवक जाणार आहे त्यांना सकाळी ८ ते १२ या वेळेत खिचडीचा नाश्ता व पाणी वाटप चे आयोजन छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आनंद भैय्या काळे व मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे तरी या मार्गाने येणाऱ्या सर्व मराठा बांधवांनी नाश्ता करूनच जावे असे आभार मराठा समाज बांधवांना केली आहे मराठा समाजाच्या प्रत्येक आंदोलनात सिंहाचा वाटा उचलणारे ओबीसी चे नेते आनंद काळे यांनी या अगोदरही खिचडी



वाटप पाणी वाटप गाड्यांची व्यवस्था यासह अनेक समाज कार्य केले आहे त्याचाच भाग म्हणून या आंदोलनातही ते मागे राहिले नाही त्यांनी या अगोदरही आंतरवाली सराटी येथे जाऊन जरंगे पाटलाच्या प्रत्येक आंदोलनात सहभाग नोंदवला त्यांच्या हॉस्पिटलमध्ये जाऊन तब्येतीची विचारपूस करणे, बीडला आल्यावर सत्काराचे आयोजन करणे एक प्रकारे जरांगे पाटलावर आनंद काळे यांचे नितांत प्रेम करणारा हा माणूस आहे कुठलाही जातीभेद न करता सर्व समाजाचे आपण देणे लागतो या भावनेने त्यांनी उद्याच्या बैठकी ला जाणाऱ्या मराठा बांधवाची गैरसोय होऊ नये म्हणून खिचडी पाणी वाटप करण्याचे आयोजित केले आनंद भैय्या काळे मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे तरी मराठा समाज बांधवांनी नाश्ता करूनच पुढे जावे असे आवाहन केले आहे

------

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
रविवार २९ जून २०२५
https://lokaarambh.com



# संपादकीय

## आखाड्यातून आखाडाकडे..

तेलकट, तुपकट, तिखट अशा सर्व पदार्थांचे आग्रह व्हायला हवेत. आखाड पार्ट्यांना आपल्या संस्कृतीत फार महत्त्व आहे. आपण या प्रकाराचे मार्केटिंग करायला कमी पडलो आहोत, असे आमचे (करपट, पण) स्पष्ट मत आहे. मआषाढस्य प्रथम दिवसे...फ काल झाला. कविमंडळींचा आवडता महिना सुरू जाहला. आषाढाचे हे माहात्म्य महाकवी कालिदासालाही ठाऊक होते. त्यामुळेच ङ्गमेघदूताफ्त हे आषाढमाहात्म्य वर्णिले आहे. आम्ही कालिदासाएवढे काय, पण सोशल मीडियावर कवितेचे बारमाही पीक काढणाऱ्या कुणा ङ्गदेवदासाफ्एवढेही कवी नसल्याने आमच्या मनात काही एवढे रोमँटिक विचार येत नाहीत. ऐहिकाच्या कर्दमात रुतलेल्या आमच्यासारख्या सामान्य जीवाला ङ्गआखाडफ खायला मिळणार, याचाच आनंद मोठा असतो. ी, अभिनेत्रीची कथा ऐकून डोळ्यात येईल पाणी बाहेर पाऊस असताना कवीच्या मनात सदैव सर्जनाला उकळी फुटत असते. आमच्याकडे खरीखुरी कढई असते आणि त्यात तळणाचे यच्चयावत पदार्थ तयार होत असतात. कवीच्या भ्रमर वृत्तीला पंख फुटतात, तर आमच्यात तामसी वृत्तीचा आगडोंब उठतो. अंगावरही शेवाळ येईल एवढा गच्च पाऊस पडत असताना, काही करू नये; नुसते पडून राहावे, असे वाटते ते याच दिवसांत. पडून राहिल्याने भूक फार लागते. अशा वेळी आम्ही दोन-तीन जेवणांच्या मध्ये थोडेफार खातो. सकाळी तिखटाच्या पुऱ्या असतील, तर दुपारच्या जेवणानंतर गोड पुऱ्या चालतात. संध्याकाळच्या चहाआधी भजी खावीच लागतात आणि रात्री साटोऱ्यांचा नैवेद्य दाखवला नाही तर आमच्या घरचा देव रागावतो. याशिवाय इतर अनेक पेयांचा आस्वाद या काळात घेता येतो. त्यासोबत खावयाच्या पदार्थांना ङ्गचखणाफ वगैरे म्हणून आपल्याकडच्या ङ्गहाय कंबख्त तूने पीही नहींफ गटातल्या मंडळींनी उगाचच त्यांना एक त्याज्य दर्जा दिला आहे. वास्तविक या काळात खारे शेंगदाणे, तुकडा चकली, पनीर चिली वगैरे पदार्थांचे यथेच्छ सेवन करावे, असे शास्त्रात लिहिले आहे. विशिष्ट पेयांचे प्राशन केल्यानंतर माणूस समाधी अवस्थेत जातो. अशा वेळी ङ्गतूच माझा भाऊफ ही जागतिक बंधुभावाची टॅगलाइन सतत ऐकायला येते. ङ्गहा युद्धाचा काळ नाही,फ वगैरे उद्गार मोठमोठे लोक काढतात. आमच्यासारखे सामान्य जीव ङ्गहा भांडणाचा काळ नाही,फ असे न म्हणताही एका गिलासात सर्व भांडणे मिटवतात. जगात वेड्यासारखी युद्धे करत बसलेल्या माणसांना तास-दोन तासांसाठी मदिरालयात का सोडत नाहीत? सर्व युद्धे पाच मिनिटांत थांबतील. मोठमोठ्या समस्यांची उत्तरे छोट्या गोष्टींत दडलेली असतात, असे कुणी महान तत्त्वज्ञाने म्हटले नसेल, तर असा एक महान तत्त्वज्ञ तात्पुरता उभा करून त्याच्याकडून हे तातडीने वदवून घ्यायला हवे. माणसामाणसांत युद्धे कशाला हवीत? त्याऐवजी आज तुमच्याकडे, उद्या आमच्याकडे अशा अंगतीपंगती झडायला हव्यात. तेलकट, तुपकट, तिखट अशा सर्व पदार्थांचे आग्रह व्हायला हवेत. आखाड पार्ट्यांना आपल्या संस्कृतीत फार महत्त्व आहे. आपण या प्रकाराचे मार्केटिंग करायला कमी पडलो आहोत, असे आमचे (करपट, पण) स्पष्ट मत आहे. ज्या मंडळींना आखाड पार्टीतली गंमत कळली नाही, ते युद्धाच्या आखाड्यात उतरून उगाच एकमेकांवर क्षेपणास्त्रेच फेक, बॉम्बच टाक, अणुभट्ट्याच फोड असले उद्योग करतात. कुठली का असेना, पण भट्टी फोडणे हे मोठे पाप! भट्टी ही तोडायची गोष्ट नसून, जमवायची गोष्ट आहे! आणि तेलासाठी कसले भांडता? तेलात तळलेल्या पदार्थांसाठी भांडा! ज्यांना तळण्याची गंमत समजली नाही, त्यांची आयुष्ये जळण्यातच संपणार... हा ङ्गक्र ूडफ विनोद नियतीने ज्यांच्या आयुष्याबाबत केला, त्यांच्याविषयी आपण फक्त सहानुभूती बाळगायची. ङ्गओम सहनाववतु सहनौभुनक्तु...फ्या शांतिमंत्र सांगणारी आपली संस्कृती... त्यामुळे ङ्गहरभरा माझ्यामुळेच टरारलाफ म्हणणाऱ्यांची जगात फक्त खिल्ली उडवली जाते. प्रेमाचा रस्ता पोटातून जातो म्हणतात. आखाडाचे खाणे आखाड्यातली भांडणे संपवते आणि एकमेकांविषयी प्रेम वाढीला लावते. अशा या आषाढ महिन्याची सुरुवात आता झाली आहे. तेव्हा खाणे आणि पिणे यांच्या जोडीला पोटभर जिणेही असेल.

# साहेब.....! आज तुमची खुप आठवण येते. जयतीनिमित्त विनम्र अभिवादन.....!



साहेब..!आज तुमचा वाढदिवस सर्व शिवसंग्राम परिवारातील सर्व सदस्य या दिवसाची अगदी आतुरतेने वाट पाहत असतो. आमच्यासाठी हा दिवस आनंदाचा दिवस परंतु हा दिवस आम्ही प्रत्येक वर्षी एकदम आनंदाने उत्साहाने साजरा करत असतो परंतु आज तुम्ही नाहीत ही गोष्ट मनाला खूप सतावत आहे..!

एक ऊर्जा प्रेरणा आत्मविश्वास मार्गदर्शन करणारी व्यक्ती आमच्यापासून हरवली आहे असा आम्हाला सारख वाटत. परंतु आज तुम्ही नाहीत आजचा दिवस कसा साजरा करावा आजचा दिवस कसा घालवावा हा माझ्यासारख्या असंख्य शिवसंग्राम प्रेमी व तुमच्यावर प्रेम करणाऱ्या कार्यकर्त्यांना वाटत आहे. साहेब मला आजही आठवतं, अवघा महाराष्ट्र व्यसनाधीनतेकडे वळत असताना माझ्या बीड जिल्ह्यातील शेतकऱ्याची मुलं कष्टकऱ्यांची मुलं ऊसतोड कामगारांची मुलं व माझा हा बीड जिल्ह्यातला सुजाण नागरिक व्यसनाधीन ते कडे वळू नाही म्हणून महाराष्ट्रातील एकमेव आमदार म्हणून व्यसनाधीनतेच्या विरुद्ध आवाज उठवून 31 डिसेंबर 2016 रोजी व्यसनमुक्ती कार्यक्रम घेणारे महाराष्ट्रातील तुम्ही पहिले आमदार आहात. अन 2016 चा तो दिवस मला आजही आठवतो त्या व्यसनमुक्तीच्या आयोजन समितीमध्ये तुम्ही मला सदस्य म्हणून घेतलं आणि त्या दिवसापासून माझी आणि तुमची ओळख झाली आणि मी तुमच्या मार्गदर्शनाखाली समाजकारण व राजकारणाचे बाळकडू घ्यायला सुरुवात केली. माझ्यासारख्या सर्वसामान्य शेतकऱ्याच्या कुटुंबातील लेकरांना आपल्यातील कौशल्य सिद्ध करण्यासाठी संधी देत असताना मराठा आरक्षण चळवळ, मराठी क्रांती मोर्चा,कोरोना काळामध्ये आपण काढलेला 5 जून रोजी चा मराठा आरक्षण मूक मोर्चा शेतकऱ्याच्या कर्जमाफीसाठी काढलेला मोर्चा असेल त्या सर्व मोर्चामध्ये आम्हाला तुम्ही काम करण्याची संधी दिली, मराठा आरक्षणाबरोबरच धनगर आरक्षण मुस्लिम आरक्षण ईद-ए-मिलाद चे कार्यक्रम दिवाळी स्नेह मिलन असे वेगवेगळ्या कार्यक्रमांमधून त्याचबरोबर सामुदायिक विवाह सोहळे अशा प्रकारचे कार्यक्रम घेत असताना आम्हाला सोबत घेऊन जे समाजकारणाचं बाळकडू तुम्ही पाजलं त्याच बाळकडूच्या जोरावर आम्ही आज तुमच्या अर्धवट राहिलेले स्वप्न पूर्ण करण्याचा प्रयत्न करत आहोत. साहेब आज तुम्ही नाहीत याची जाणीव जीवनाच्या प्रवासाच्या प्रत्येक पाऊल पाऊल होत आहे तुम्ही दिलेली शिकवण केलेलं मार्गदर्शन याच्या जोरावर आम्ही वर्षानुवर्षे काम करत आहोत इथून पुढे देखील करत राहू परंतु आज त्या केलेल्या कामाची पावती म्हणून पाठीवरती थाप टाकणार कोणी नाही याची खूप खंत होते. तुमची पाठीवरती पडलेली थाप दहा हत्तीचं बळ देऊन जाते. तुम्ही दिलेल्या मार्गदर्शनाखाली अनेक सामाजिक राजकीय गड सर करत पुढे वाटचाल करत आहोत. इथून पुढेही असेच आशीर्वाद आमच्या पाठीशी राहू द्या म्हणजे आम्हाला कधीच एकट वाटणार नाही.....,

साहेब.....! साहेब तुम्ही आम्हाला सोडून गेल्यानंतर आमचं कुठेच मन रमत नव्हतं आम्ही सकाळी उठलो की शिवसंग्राम भवन वरती जायचं असं नियमित करत असताना एका दिवशी सहज आवाज आला मुकुंद ला बोलवा रे साहेब हे शब्द कानावर पडले आणि मन भरून आले साहेब तुम्ही असताना फक्त ज्या माऊलीची आणि आमची फक्त ओळख होती त्या माऊलीने ज्यावेळी मला हाक मारली त्यावेळी आम्हाला जाणीव झाली की साहेब तुम्ही शरीर रूपाने जरी आमच्यात नसलात तरी मनाने माऊलीच्या रूपाने तुम्ही आमच्यात आहात, तुम्ही जितकं प्रेम आमच्यावरती करायचा त्यापेक्षा नक्कीच काकनं भर का होईना पण जास्त प्रेम आमच्या माऊली ( डॉक्टर ज्योतीताई विनायक राव जी मेटे )आमच्यावरती प्रेम करतात,

साहेब तुम्ही दिलेले बाळकडू आणि ताईचा मार्गदर्शन याच्या जोरावर तुमची अर्धवट राहिलेली स्वप्न त्यामध्ये अरबी समुद्रातील स्मारक असेल मराठा समाजाला आरक्षण असेल व इतरही आणखीन सर्वसामान्य गोरगरीब जनतेचे जे प्रश्न असतील ते सतत आण आयुष्यभर ताईच्या सोबत राहून पूर्ण करण्याचा आमचा आजच्या दिनी निश्चय आहे. अन केलेलं कार्य तुमच्या चरणी समर्पित करतो. साहेब पुन्हा एकदा आपल्या चरणी नतमस्तक होतो.

**तुमचा मावळा**
**मुकुंद गोरे पाटील**
**उपसरपंच दगडी शहाजनपूर ता. जि. बीड**

# लिंबागणेश येथे महसूल विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर उत्साहात संपन्न

लिंबागणेश:- ( दि.२८ ) बीड तालुक्यातील लिंबागणेश महसूल मंडळातील गावांसाठी महसूल विभागाच्या वतीनेङ्ग छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर अंतर्गत ङ्गमहाराजस्व समाधान शिबिर ङ्गजिल्हाधिकारी विवेक जान्सन, निवासी उपजिल्हाधिकारी शिवशंकर स्वामी, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि. २८ शनिवार रोजी सकाळी लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात आयोजन करण्यात आले. प्रमुख उपस्थिती म्हणून नायब तहसीलदार आण्णासाहेब वंजारे, मंडळ अधिकारी महादेव जायभाये,ग्राम महसूल अधिकारी तलाठी लिंबागणेश गणपत पोतदार, तलाठी नारायण दराडे अंजनवती, तलाठी शेख गफुर लोणीघाट,तलाठी विपुल बनकर बेलखंडी पाटोदा,तलाठी अक्षय शिंदे बोरखेड,पुरवठा निरीक्षक श्रीराम वायभट,पुरवठा निरीक्षक संतोष मुळीक महसूल सेवक ललित काकडे आदींची उपस्थिती होती.



तहसील कार्यालयातील महसूल विभागाच्या संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना, रेशनकार्ड, अपंग नोंदणी,वारस नोंदी, विवाह नोंदणी,जाती प्रम ाणपत्र, रहिवासी दाखले, उत्पन्न प्रम ाणपत्र,जातीचे दाखले वाटप, आधार लिंक,आदि विविध सेवा पुरविण्यात आल्या.ज्या अनुदान डीबीटी यावेळी बंद पडले होते अशा लाभार्थ्यांची डीबीटी कामे पूर्ण करण्यात आली. तसेच अग्रो स्टार फेरफार अदालत, जिवंत सातबारा मोहीम, नकाशावरील रस्ते खुले करणे इत्यादी बाबत म ार्गदर्शन करण्यात आले.

तसेच विविध दाखल्यांचे वाटप करण्यात आले. मंडळ अधिकारी जायभाये आणि तलाठी गणपत पोतदार यांनी कामकाज पाहून कार्यक्रम यशस्वी केला.यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गिरे, जीवन मुळे,अँड.गणेश वाणी, संतोष भोसले,शेख अझीम, संतोष वाणी,भालचंद्र वायभट,सुंदरराव येडे,जितु निमर्ळ,केशव गिरे, वैजनाथ भोसले आणि डॉ.गणेश ढवळे व पत्रकार हरीओम क्षीरसागर तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक, शेतकरी महिला बहुसंख्येने लाभार्थी उपस्थित होते.यावेळी डीबीटीचे काम मोठ्या प्रमाणात झाल्याबद्दल लाभार्थ्यांनी व गावकऱ्यांनी महसूल प्रशासनाचे आभार मानले.

# जगाला हिरव्या मशालींची गरज- सिने अभिनेते सयाजी शिंदे

## श्री क्षेत्र रामगडावर १० एकर मध्ये फुलणार सह्याद्री देवाराई, सयाजी शिंदे यांच्या हस्ते ७५ झाडे लावून वृक्ष लागवडीला सुरूवात



प्रतिनिधी बीड जगाला आपल्याकडून काही देता आलं तर ते वृक्ष लागवडीतून देता येईल. सध्या जगाला हिरव्या मशालींची गरज आहे. त्यामुळे प्रत्येकानी आपल्या आई-वडिलांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या वाढदिवसा येवढे झाडे लावली पाहिजेत. असे आवाहन सिने अभिनेते सयाजी शिंदे यांनी केले. बीड तालुक्यातील श्री क्षेत्र रामगड येथे १० एकर मध्ये फुलणाऱ्या सह्याद्री देवराई प्रकल्पाची सुरूवात त्यांच्या हस्ते ७५ झाडे लावून करण्यात आली. यावेळी आयोजित पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते. शहरातील हॉटेल ऑलिव्ह येथे शनिवारी आयोजित पत्रकार परिषदेमध्ये सिने अभिनेते सयाजी शिंदे बोलत होते. यावेळी लेखक अरविंद जगताप, सह्याद्री देवराई समन्वयक शिवराम घोडके यांची उपस्थिती होती. शहरापासून पाच किलो मीटर अंतरावर असलेल्या पालवनच्या डोंगरावर २०१६-१७ मध्ये सिने अभिनेते सयाजी शिंदे, अरविंद जगताप, शिवराम घोडके यांनी वन विभागाच्या २५० एकरमध्ये १ लाख ६४ हजार विविध जातीचे वृक्ष लावून ३ एकर मध्ये ३ घन वन तयार केलेले आहे. त्याच धर्तिवर बीड पासून ७ किलो मीटर अंतरावर असलेल्या रामगडावर १० एकर मध्ये देवराई २ होणार आहे. येथे विविध सुगंधी, पक्षी बसणारे, औषधी, फळ, सावली देणारे १० हजार वृक्ष लावण्यात येणार आहेत. तर ४० गुंठ्यामध्ये २ घन वन प्रकल्पाचे काम १५ रोजी मे पासून सुरू झाले आहे. आतापर्यंत येथे ५ हजार खड्डे जेसीबीच्या सहायाने खोदण्यात आले आहे. या प्रकल्पाची माहिती देण्यासाठी अभिनेते सयाजी शिंदे यांनी पत्रकार परिषद घेवून माध्यमांशी संवाद साधला. श्री क्षेत्र रामगड येथे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी साळवे, डॉ. प्रदीप शेळके, सुहास वायंगणकर, सागर साठे,माजी सरपंच कोंडीराम निकम, शरद निकम हे उपस्थिती होते.-----

### लेखक अरविंद जगताप यांच्या वडिलांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त ७५ झाडांची लागवड

श्री क्षेत्र रामगड येथे होणाऱ्या देवराई प्रकल्पाची सुरूवात लेखक अरविंद जगताप यांच्या वडिलांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त येथे वेगवेगळ्या जातीचे ७५ झाडे लावून सिने अभिनेते सयाजी शिंदे यांच्या हस्ते सुरूवात करण्यात आली. प्रत्येकानी आपल्या आई-वडिलांच्या वाढदिवसानिमित्त असा उपक्रम राबवावा असे आवाहन सयाजी शिंदे यांनी यावेळी केले.

### सिता वन, राम वन, पंचवटी होणार

येथे विविध जातीचे वृक्ष लागवड केली जाणार आहे. त्यामध्ये वेगवेगळे वृक्ष असणार आहेत. गडाजवळ कमी उंचीचे त्यापुढे मोठ-मोठे असे वृक्ष लागवड होणार आहे. विशेष म्हणजे येथे सिता वन, राम वन अणि पंचवटी वन तयार करण्यात येणार आहे.

---

### एका झाडामध्ये १५ फुटाचे अंतर मध्ये २० फुटाचा असणार रस्ता

१० एकर मध्ये झाडे लावताना त्याचा अभियंत्यामार्फत पूर्ण प्लॅन तयार करून घेण्यात आला आहे. येथे विविध कार्यक्रमाला आलेल्या नागरिकांना सहज झाडाच्या सावलीला बसता येईल झाडाखाली वाहन पार्क करता येईल. वाहन पार्किंगच्या ठिकाणी दोन्ही झाडांच्या मध्ये २५ फुटांचे अंतर ठेवण्यात येणार आहे. प्रत्येक झाडामध्ये १५ फुटाचे अंतर असणार असून मध्ये २० फुटाचे रस्ते बनवण्यात येणार आहेत.

### अगोदर डोक्यात झाड लावा, नंतर जमिनित- शिवराम घोडके

वृक्ष लागवड ही काळाची गरज आहे. त्यासाठी प्रत्येकानी अगोदर डोक्यात झाड लावलं पाहिजे. जोपर्यंत आपल्या डोक्यात झाड लावून जगवण्याची संकल्पना उतरणार नाही. तोपर्यंत जमिनीत झाडे लागणार नाहीत. त्यामुळे अगोदर आपल्या डोक्यात झाडे लावा. वृक्ष लागवड ही सह्याद्री देवराई, वनविभाग, रामगड आणि भक्तांच्या सहकार्यातून होत आहे. सह्याद्री देवराईचे काम पूर्ण झाल्यानंतर आलेल्या प्रत्येक भाविकाला प्रसाद म्हणून रामगडावर झाड दिले जाणार आहे. भाविकांनी ते झाड आपल्या शेतात लावावे.

**-शिवराम घोडके, जिल्हा समन्वयक, सह्याद्री देवराई**

बीड/महाराष्ट्र
विशेष वार्ता
दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
रविवार २९ जून २०२५
https://lokaarambh.com


# राज्यात यंदा शाळांना तब्बल 128 दिवसांची सुट्टी! शिक्षण विभागाकडून सुट्ट्यांची अधिकृत यादी जाहीर




मुंबई | प्रतिनिधी राज्य शिक्षण विभागाने शालेय वर्ष २०२५-२६ करिता शाळांच्या सुट्ट्यांची अधिकृत यादी नुकतीच जाहीर केली असून यंदा विद्यार्थ्यांना तब्बल १२८ दिवस सुट्टी मिळणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. यामध्ये रविवार, सण-उत्सवाच्या सार्वजनिक सुट्ट्या आणि उन्हाळी सुट्टीचा समावेश आहे. या यादीनुसार, रविवारच्या ५२ सुट्ट्या, विविध सण व धार्मिक साजऱ्यांमुळे ७६ दिवसांच्या सुट्ट्या आणि उन्हाळी सुट्टीसाठी ३८ दिवस राखीव ठेवण्यात आले आहेत. २ मे ते १३ जून २०२६ दरम्यान उन्हाळी सुट्टी असणार असून, दिवाळी सुट्टी १६ ते २७ ऑक्टोबर पर्यंत असेल. शालेय कामकाजाच्या एकूण २३७ दिवसांपैकी २१० दिवस वर्गकार्य, १४ दिवस परीक्षा व मूल्यांकन, १० दिवस सहशालेय उपक्रम, तर १३ दिवस शनिवार, सण-उत्सव व शिबीरांसाठी नियोजित करण्यात आले आहेत. काही महत्त्वाच्या सुट्ट्यांची झलक: जुलै : आषाढी एकादशी, मोहरम, नागपंचमी ऑगस्ट : रक्षाबंधन, स्वातंत्र्य दिन, गणेश चतुर्थी सप्टेंबर : गौरी विसर्जन, ईद-ए-मिलाद, अनंत चतुर्दशी, घटस्थापना ऑक्टोबर : गांधी जयंती, दिवाळी नोव्हेंबर : गुरूनानक जयंती डिसेंबर : ख्रिसमस जानेवारी : मकरसंक्रांती, प्रजासत्ताक दिन, शबे-ए-मेराज फेब्रुवारी : महाशिवरात्री, शिवजयंती, शब-ए-बरात मार्च : धुलिवंदन, गुढीपाडवा, रमजान ईद, रामनवमी एप्रिल : गुड फ्रायडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मे : महाराष्ट्र दिन या वाढलेल्या सुट्ट्यांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचं वातावरण असून, पालकवर्गानेही समाधान व्यक्त केलं आहे. मात्र, अभ्यासक्रम पूर्ण करण्याच्या दृष्टीने शिक्षक व शाळांपुढे नियोजनाचं मोठं आव्हान असणार आहे.

# डॉ. गंगाधर पानतावणे यांच्या जयंतीनिमित्त समाज परिवर्तनकर्त्याला आदरांजली



प्रतिनिधी | २८ जून आज, २८ जून रोजी, लेखक, संशोधक, समीक्षक आणि आंबेडकरी विचारवंत डॉ. गंगाधर पानतावणे यांची जयंती देशभरात आदरपूर्वक साजरी करण्यात येत आहे. दलित साहित्य चळवळीतील एक प्रभावशाली व्यक्तिमत्त्व म्हणून ते ओळखले जातात. 'अस्मितादर्श' या त्रैमासिकाच्या माध्यमातून त्यांनी नवोदित लेखकांना स्वतंत्र व्यासपीठ दिले. त्यांच्या लेखनात फुले-शाहू-आंबेडकर तत्त्वज्ञानाचा प्रभाव स्पष्टपणे दिसतो. धम्मचर्चा, मूल्यवेध, मुकनायक, लेणी यांसारख्या अनेक ग्रंथांमधून त्यांनी दलित आणि बहुजन समाजाच्या व्यथा, आशा आणि प्रेरणा व्यक्त केल्या. त्यांच्या साहित्यसेवेबद्दल त्यांना साहित्य अकादमी पुरस्कार तसेच भारत सरकारचा पद्मश्री पुरस्कार (२०१८) प्राप्त झाला. सामाजिक समतेसाठी लढणारा एक अत्यंत प्रबोधनकारी आवाज म्हणून त्यांचे स्थान आजही अढळ आहे. डॉ. पानतावणे यांच्या जयंतीनिमित्ताने त्यांना विनम्र अभिवादन करून, त्यांच्या कार्याची प्रेरणा घेण्याची गरज आज अधिक आहे.

# शाळाबाह्य मुलांच्या शोधासाठी पाचोडमध्ये घरभेट मोहीम राबवली



प्रतिनिधी | पाचोड पाचोड (ता. सोयगाव) येथे शाळाबाह्य मुलांचे पुनःशालेयिकरण करण्यासाठी विशेष मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेअंतर्गत स्थानिक शिक्षकांनी गावातील प्रत्येक घराला भेट देत मुलांची माहिती संकलित केली. मोहिमेची सुरुवात गावातील प्रत्येक कुटुंबाची यादी तयार करून झाली. त्यानंतर शासननिर्धारित अ, ब, क, ड फॉर्मनुसार माहिती भरून शाळाबाह्य मुले ओळखण्यात आली. स्थलांतरित वस्तीतील झोपड्यांनाही भेटी देण्यात आल्या. या दौऱ्यादरम्यान शाळाबाह्य मुले शोधून त्यांची यादी तयार करण्यात आली आणि त्यांना तत्काळ शाळेत प्रवेश देण्यात आला. या उपक्रमात केंद्रप्रमुख बळीराम भुमरे यांच्या मार्गदर्शनाखाली गणेश काथार, बाळासाहेब थोरे, उमेश नारळे, नानासाहेब तांबे, चंद्रमुनी चावरे, कीर्ती गडवे व अशोक गायकवाड यांचा सक्रिय सहभाग होता. ही मोहीम शिक्षण विभागाच्या 'सर्वशिक्षा अभियान' अंतर्गत राबविण्यात आली असून, गावातील सर्व मुलांना शालेय शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला जात आहे.

# मराठी पत्रकार परिषदेकडून वारकऱ्यांना पाणी बॉटल वाटप

## पंढरपूर कडे जाणाऱ्या दिंड्यातील वारकऱ्यांची सेवा म्हणजे पांडुरंगाची सेवा



**पाटोदा प्रतिनिधी पाटोदा शहरातून पंढरपूरकडे जाणाऱ्या दिंड्या मोठ्या प्रमाणात असल्याने विविध सामाजिक संघटनेकडून राजकीय पक्षाकडून वारकऱ्यांचे दिंड्यांच स्वागत मोठ्या उत्साहात केले जाते. यामध्ये पत्रकारांनी ही सहभाग नोंदवत वारकऱ्यांसाठी पाणी बॉटल वाटप करून सामाजिक बांधिलकी जपली आहे.शनिवारी राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या दिंडीचा आगमन पाटोदा शहरामध्ये झालं दिंडीतील सर्व वारकऱ्यांसाठी मराठी पत्रकार परिषदेकडून पाणी बॉटल वाटप करण्यात आले. प्रत्येक वारकऱ्यांची सेवा ही पांडुरंगाची सेवा समजून मराठी पत्रकार परिषदेच्या सर्व पत्रकार बांधवांनी आपली सामाजिक बांधिलकी जपत हा उपक्रम राबवला आहे. विविध उपक्रमातून नेहमीच सक्रिय असणारी मराठी पत्रकार परिषद आणि सर्व सदस्य हे सामाजिक भान ठेवून उपक्रम घेतात आणि त्यांचे कौतुकही सर्व क्षेत्रातून होत आहे. यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे तालुकाध्यक्ष अजय जोशी, कार्याध्यक्ष सोमनाथ खंडागळे, उपाध्यक्ष अनिल गायकवाड यांच्यासह मराठी पत्रकार परिषदेचे सदस्य सक्रिय सहभाग नोंदवत या दिंडीतील वारकऱ्यांसाठी पाणी वाटपाचं काम करत होते.**

### वारकऱ्यांची सेवा म्हणजे पांडुरंगाची सेवा

पंढरपूरच्या विठुरायाच्या दर्शनासाठी आषाढीनिमित्त जाणाऱ्या दिंड्या मोठ्या प्रमाणात पाटोदा शहरातून जातात त्यांचा स्वागत सर्वच राजकीय सामाजिक क्षेत्रातील बांधव मोठ्या प्रमाणात करतात आम्हीही पत्रकार बांधवांनी यावर्षी पाणी वाटपाचे कार्यक्रम हाती घेतला होता यामध्ये सर्व पत्रकारांनी सहभाग नोंदवत सर्व वारकऱ्यांची सेवा म्हणजे पांडुरंगाची सेवा हेच समजून कार्य केले आहे..

**– अजय जोशी**
**अध्यक्ष मराठी पत्रकार परिषद पाटोदा.**


**वारकऱ्यांची सेवा करायला मिळणं हे अहोभाग्य–प्रा.एस खंडागळे**

आषाढी वारीनिमित्त पंढरपूर कडे जाणाऱ्या वारकऱ्यांची सेवा करायला भेटणं हे अहोभाग्य च आहे.मराठी पत्रकार परिषद पाटोदा च्या वतीने जिल्हा उपाध्यक्ष सचिन पवार सर यांच्या मार्गदर्शनाखाली,ता.अध्यक्ष अजयजी जोशी यांच्या समवेत पाटोदा शाखा आपली सामाजिक बांधीलकी अन आध्यत्मिक वारसा जपत असल्याचा सार्थ अभिमान आहे.

**–प्रा.सोमीनाथ खंडागळे**
**(कार्याध्यक्ष–मराठी पत्रकार परिषद पाटोदा)**

# धाराशिव जिल्ह्याच्या उपाध्यक्षपदी सिराज शेख यांची निवड व अध्यक्षपदी महेश मिनियार यांची नियुक्ती यांचा समावेश केला आहे: टॅक्स प्रॅक्टिशनर सर्टिफाइड ऑडिटर

सिराज शेख हे इनकम टॅक्स क्षेत्रातील एक नामांकित टॅक्स प्रॅक्टिशनर सर्टिफाइड ऑडिटर असून, त्यांनी आयकर या विषयावर पुस्तक लिहिले आहे. त्यांच्या १५ वर्षांच्या प्रदीर्घ अनुभवामुळे ते कर सल्लागार म्हणून विश्वासार्ह मानले जातात. व्यावसायिक पार्श्वभूमी सिराज शेख यांना पारंपरिक व्यवसाय आणि शेती अनुषंगाने कर आणि इतर संबंधित क्षेत्रात उल्लेखनीय अनुभव आहे. त्यांनी अनेक लघुउद्योग, शेतकरी व व्यावसायिक लोकांना कर विषयक मार्गदर्शन करून आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. तसेच ते सहकार विभाग लागू यांचे विविध विषयावरील मार्गदर्शन करतात आणि त्यांचे




सतत मार्गदर्शन चालूच असते. त्यामुळे ते राष्ट्रीय सहकार भवन, दिल्ली येथील मानव संसाधन विकास संस्थेमार्फत गौरविण्यात आले आहेत. प्रमुख सेवा: आयकर नियोजन फाईलिंग संबंधित सेवा ऑडिट सेवा प्रकल्प अहवाल (झीक्षशर्लीं ठर्शिीीं) तयार करणे बँकेसाठी प्रस्ताव तयार करणे दस्तऐवज तयार करणे आयकर अपील आणि कर वादावरील सल्ला ग्रामीण भागातील योगदान सिराज शेख हे केवळ कर सल्लागार नसून, त्यांनी आपल्या व्यवसायातून ग्रामीण भागातील उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी सतत प्रयत्न केले आहेत. त्यांनी अनेक लोकांना कर नियोजनाच्या माध्यमातून आर्थिक दृष्टिकोन देण्यास मदत केली आहे. विशेष उल्लेख: सिराज शेख यांची प्रमाणिकता, पारदर्शकता आणि ग्राहकहित यांना प्राधान्य देऊन सेवा उत्कृष्ट स्वरूपात दिली जाते. ग्रामीण भागातील लोकांना व्यवसाय वाढीसाठी योग्य दिशा देण्यात त्यांचे योगदान अमूल्य आहे. सिराज शेख यांची नुकतीच धाराशिव जिल्ह्याच्या उपाध्यक्षपदी निवड झाली असून, याच समितीचे अध्यक्ष म्हणून महेश मिनियार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही निवड त्यांच्या सामाजिक आणि व्यावसायिक योगदानाची दखल घेत करण्यात आली असून, जिल्ह्यातील कर सल्लागार क्षेत्रातील ही एक गौरवाची बाब ठरली आहे.

# बाजीराव पाटील विद्यालयात छत्रपती राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी

स्फुर्ती शिक्षण संस्था जांब संचलित बाजीराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय जांब.शिरूर.(का) जि.बीड विद्यालयात दि.२६ जून २०२५ रोजी छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक तुकाराम खाडे तर प्रमुख अतिथी म्हणून भांगे सर व जायभाये सर हे उपस्थित होते. सर्व प्रथम राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले .शाळेतील विद्यार्थ्यांने छत्रपती शाहू महाराज यांच्या जिवनावर भाषण केले सर्वप्रथम कु.आरती वाघमारे,कु.सिमरन शेख,कु अक्षरा सातपुते,चि .समाधान सातपुते,चि.सुरज सातपुते इ.या नंतर प्रमुख अतिथी भांगे सर यांनी शाहू महाराजांनी समाजातील वंचीत आणि उपेक्षित घटकांच्या उन्नतीसाठी केलेल्या कार्याची प्रशंसा केली तर जायभाये सर यांनी जातीय भेदभावाचे मिमूलन आणि सर्वांसाठी समान संधी उपलब्ध करून देण्याच्या त्यांच्या योगदानावर भर दिला अध्यक्षीय समारोपात बोलताना मुख्याध्यापक तुकाराम खाडे यांनी छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी घालून दिलेल्या आदर्शानुसार समाजात समानता व न्याय प्रस्थापित करण्याचा संकल्प विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवला कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार अशोक मोरे यांनी केले



# भारतीय संविधान व लोकशाही चे भवितव्य अबाधित ठेवण्याकरता

२८ जुन २०२५ भारतीय संविधान व लोकशाही चे भवितव्य अबाधित ठेवण्याकरताम हाराष्ट्रातील सर्व राजकीय पक्षांना उद्देशून..........मा. गोपीचंद पडळकर यांनी केलेल्या जाहीर वक्तव्याबद्दल............
कुपवाड, सांगली येथील ऋतुजा राजगे यांच्या दुर्दैवी आत्महत्येच्या घटनेनंतर, या घटनेची कुपवाड पोलीस ठाण्यात रीतसर कारवाई चालू असताना, या घटनेचे राजकीय भांडवल करून ज्याप्रकारे समाजमन कलुशीत करण्याचा प्रयत्न चालू आहे, त्याबद्दल..........
मा. पडळकरांची भाषा ही उघडपणे, भारतीय दंडसंहितेचे उल्लंघन करणारी आहे हे सर्व राजकीय पक्षांना, प्रशासनाला, पोलिस यंत्रणेला व न्यायपालिकेला माहीत आहे. मा. विधायक हे सत्ताधारी पक्षाचे असल्यामुळे, सत्ताधारी पक्ष हे त्यांच्या विरूद्ध कारवाई करतीलच याची फारशी अपेक्षा नाही. पण जेव्हा अश्या प्रकारे राजरोसपणे राज्यघटनेची पायमल्ली होत असताना प्रशासन, पोलिस यंत्रणा व न्यायपालिका निष्क्रीय राहते हे दुर्दैवी आहे व ते लोकशाहीला घातक आहे.
एकवेळ आपण असे गृहीत धरू की, ख्रिस्ती समाज हा परंपरेने धर्मनिरपेक्ष पक्षांच्या बाजूने राहिला आहे म्हणून त्या समाजावर इतरांचा रोष असू शकतो. पण यासर्व घटनाक्रमात व या सर्व कालावधीत, स्वतःला धर्मनिरपेक्ष समजणारे आणि संविधानाचे पुस्तक घेऊन मिरवणारे पक्ष कोठे आहेत? आजतागायत त्यांच्याकडून एकही प्रतिक्रिया आलेली नाही, याचा अर्थ काय घ्यावा? यामध्ये ख्रिस्ती समाजाची बाजू घ्यावी की न घ्यावी हा विषय नाही. पण हे राज्य, राज्य घटनेप्रमाणे चालले आहे किंवा नाही, हा मूलभूत प्रश्न आहे.
कारण मा. विधायकांची भाषा ही केवळ द्वेषमूलक नसून, ती एका गुंडप्रवृत्तीची आहे; एका सुपारीबहाद्दुराची आहे.भारतीय राजकारणाच्या इतिहासात कांहीं काळ असा होता की, राजकीय नेते हे आपल्या पदरी गुंड बाळगून असायचे. पण आता मात्र हे गुंडच राजकीय नेते बनले आहेत की काय अशी शंका घेण्यास वाव आहे.
वास्तविक पाहता, प्रमुख विरोधी पक्षांनी या चिथावणीखोर भाषणाचा समाचार घेणे आवश्यक होते. यामध्ये ख्रिस्ती समाजावर विनाकारण अन्याय होतोय यापेक्षा भारतीय राज्यघटनेवर हल्ला होत आहे त्याची विरोधी पक्ष नेत्यांनी राजकीय दखल घेऊन, सत्ताधाऱ्यांना जाब विचारावयास हवा होता.
प्रस्थापित राज्यकर्ते हे कसे भारतीय राज्यघटनेच्या विरोधात कार्यरत आहे याची मांडणी करून निषेध करणे हा खरा लोकशाही जिवंत ठेवण्याचा मार्ग आहे. दुर्दैवाने भारतातील विरोधी पक्ष नेते हे एक तर झोपलेले आहेत किंवा त्यांनी सोयीस्कररित्या झोपेचे सोंग घेतलेले आहे, असेच म्हणावे लागेल. लोकशाही जिवंत ठेवण्याची जबाबदारी ही खरी म्हणजे सत्ताधाऱ्यां इतकीच विरोधी पक्षांची देखील आहे व त्यांना ही एक संधी होती.
अजूनही वेळ गेलेली नाही. म्हणून सर्व राजकीय पक्षांना आवाहन करण्यात येत आहे की, मा. पडळकरांवर, त्यांच्या अश्या बेताल, बेकायदेशीर वक्तव्याबद्दल, त्यांचा राजीनामा घेऊन, त्यांच्यावर योग्य त्या फौजदारी कलमांनुसार गुन्हा दाखल करून , लोकशाहीची बूज राखावी. अन्यथा हीच विचारसरणी, उद्या लोकशाहीचा गळा घोटल्या खेरीज राहणार नाही, याची दखल घ्यावी, ही विनंती.

**रेव्ह.फा.विनोद एस कापसे**
**संत पौल बिलीवर्स ईस्टर्न चर्च उमापुर.**

# विजय पवार हा आमदार संदीप क्षीरसागरांचा राईट हॅन्ड असून, घटनेनंतर रात्री आमदारांच्या घरी जाऊन संबंधित यंत्रणांना फोन केले गेले. इतक्या गंभीर गुन्ह्यात आरोपी फरार राहतो, यामागे कोणाचा दबाव आहे का, याचा तपास झाला पाहिजे डॉ.क्षीरसागर

बीड दि.२८ : नीट परीक्षेची तयारी करणाऱ्या १७ वर्षीय विद्यार्थिनीच्या लैंगिक छळ प्रकरणातील आरोपी शिक्षक विजय पवारला राजकीय पाठबळ असल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केला आहे. विजय पवार हा आमदार संदीप क्षीरसागरांचा राईट हॅन्ड असून, घटनेनंतर रात्री आमदारांच्या घरी जाऊन संबंधित यंत्रणांना फोन केले गेले. इतक्या गंभीर गुन्ह्यात आरोपी फरार राहतो, यामागे कोणाचा दबाव आहे का, याचा तपास झाला पाहिजे. शिक्षण क्षेत्रात पवार यांचा दबदबा असून, याआड अनेक आर्थिक गैरव्यवहार झाले असल्याचा आरोपही डॉ. क्षीरसागर यांनी केला. या प्रकरणाची सखोल चौकशी करून पीडितेला न्याय द्यावा. तसेच, सोमवारी बीड जिल्हा बंद पुकारण्यात आला



असून सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. विजय पवार हा आमदार संदीप क्षीरसागर यांचा निकटवर्तीय आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर तो लोकप्रतिनिधीच्या घरी गेला आणि त्यानंतर फरार झाला, असे सांगत यंत्रणेवर दबाव टाकला गेला का, याची चौकशी करण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले. शिक्षण क्षेत्रात पवारचा दबदबा असून, याआड आर्थिक गैरव्यवहार, जमीन घोटाळे व क्लासेस चालक व विद्यार्थ्यांना त्रास देण्याचे प्रकार घडले आहेत. या घटनेमुळे पालक व विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, बीडमध्ये शनिवारी शैक्षणिक बंद पाळण्यात आला. सोमवारी जाहीर करण्यात आलेल्या जिल्हा बंदमध्ये सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ.क्षीरसागर यांनी केले. पीडित मुलगी मानसिकदृष्ट्या खचली असून, तिच्या कुटुंबीयांनी पुढे येऊन आवाज उठवावा, तसेच हा लढा सर्वांचा व्हावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करून पीडितेला न्याय मिळवून देण्यासाठी स्वतः पुढाकार घेणार असल्याचे डॉ. योगेश क्षीरसागर यांनी सांगितले.

## राजकारण बाजूला ठेवून एकत्र येण्याचे आवाहन

पोलीस अधीक्षकांकडून तसेच पीडितेच्या कुटुंबियांकडून माहिती घेतली असून, संपूर्ण प्रकरण पालकमंत्र्यांसमोर मांडले जाणार आहे. पवारचे सीडीआर तपासणे, सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेणे आणि आरोपीवर कठोर कारवाई करणे आवश्यक असल्याचे डॉ.क्षीरसागर यांनी स्पष्ट केले. राजकारण बाजूला ठेवून आरोपीला वाचवण्याचा कोणताही प्रयत्न होऊ नये, यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.

# निमका पत्ता कडवा है..विजय पवार भडवा है..!

## बेंबीच्या देठापासून ओरडणाऱ्यांनो लेकीच्या अब्रूचं तुम्हाला काही देणं-घेणं नाही

### जिल्ह्यात एवढी मोठी घटना घडली या भडव्या विजय पवारने अल्पवयीन मुलीला कपडे काढायला लावले तिचे फोटो काढले तरी सुद्धा जिल्ह्यातले सात आमदार अन् दोन खासदारांचे तोंड कोणत्या दाबणाने शिवलेत!

शहरातील उमाकिरण बाल लैंगिक अत्याचार प्रकरणी दोन दिवसांपासून जिल्ह्यात तीव्र पडसाद उमटत आहेत. या घटनेच्या निषेधार्थ आज शैक्षणिक बंदची हाक दिली होती. या हाकेला ओ देत शहरात शाळा, कॉलेज, क्लासेस कडकडीत बंद पाळण्यात आले. तर काहींनी शहरातून दुचाकी रॅली काढून निषेध करीत विजय पवार व त्याच्या सहकार्याला अटक करा अशी मागणी करीत मोठी घोषणाबाजी केली. यामुळे शहरात फक्त निमका पत्ता कडवा,विजय पवार भडवा अशी चर्चा सुरू झाली. दोन दिवसात आरोपी अटक नाही झाले तर बीड बंदचा इशारा जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे. उमाकिरण संकुलातील खाजगी कोचिंग क्लासेस चालक विजय पवार आणि प्रशांत खाटोकर या दोघांनी क्लासेसच्या केबिनमध्ये बोलावत सतत अल्पवयीन विद्यार्थींनीशी लैंगिक चाळे करीत तिचे नग्न फोटो काढले तसेच तिला अश्लील व्हिडिओ दाखविण्यात आले. याप्रकरणी बीडचा स्वंयघोषित शिक्षणतज्ज्ञ म्हणून मिरवणारा विजय पवार व त्याचा सहकारी प्रशांत खाटोकर या दोघांवर बाल लैंगिक आत्याचाराचा गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेने शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे. शिक्षण क्षेत्राला



हा काळीमा असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. याचे पडसाद जिल्हाभर उमटत आहेत. कालपासून संतप्त नागरिकांनी उमाकिरण संकुलास घेराव घातला असून, येथे जोरदार घोषणाबाजी करण्यात येत आहे. आरोपीला अटक करण्याची मागणी करण्यात येत आहे. येथे काही अनुचित प्रकार घडू नये म्हणून सर्वच क्लासेसला सुट्टी देऊन या इमारतीच्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त लावण्यात आला आहे. या घटनेच्या निषेधार्थ आज बीड जिल्हा शैक्षणिक बंदची सचिन उबाळे यांनी हाक दिली होती. या हाकेला बीडमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून शंभर टक्के कडकडीत बंद पाळण्यात आला. यावेळी काहींनी मोठ्या प्रमाणात घोषणाबाजी करुन आरोपींना अटक करण्याची मागणी केली. तसेच शहरातून दुचाकी रॅली काढून या लिंग पिसाटांचा निषेध करून घोषणाबाजी करण्यात आली. या घोषणांनी शहर दणाणून गेले होते. शिष्टमंडळाने आज जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन निवेदन दिले. यामध्ये त्यांनी विजय पवार आणि प्रशांत खाटोकर या दोघांना तातडीने अटक करुन कठोर कारवाई करावी अशी मागणी केली. तसेच दोन दिवसांत आरोपी अटक नाही झाले तर जिल्हा बंद करण्याचा इशारा देण्यात आला. तसेच महिला शिष्टमंडळाने पोलीस अधीक्षक कार्यालयात धडकून आरोपींना अटक करुन कडक कारवाई करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. तर या विजय पवारचे अनेक कारनामे चर्चिले जात असून, याने पैशाचा माज दाखवत अनेकांना त्रास दिलेला आहे.

## उमाकिरण शिक्षण संकुल प्रकरणात डखढ चौकशी करण्यात यावी(कामरान खान शिवसेना अल्पसंख्याक जिल्हा प्रमुख,बीड)

बीड २८ जून प्रतिनिधी

शिक्षणाच्या मंदिरात लोक फक्त आपली मुलीच नाही तर आपली जीवपेक्षा महत्त्व असणारी इज्जत शिष्य च्या रूपात शिक्षक व गुरूकडे विश्वासाने शिक्षण घेण्यासाठी पाठवतात पण (विजयपवार)सारखे ह्या म ाणसाचे रूपात लपलेले निर्लज्ज राक्षसांनी आज अजून एकदा गुरू शिष्याचा हा पवित्र नातेला कलंक लावण्याचा काम उमाकिरण शिक्षण संकुल या ठिकाणी केला,असे अश्लील,निंदनीय,माफीच्या लायक नसलेला कृत्य बीडचा ह्या समाज बारदश्त करून घेणार नाही,प्रशासनांनी लवकर ते लवकर (आरोपी विजय पवारला)अटक करण्यात यावे,विशेष म्हणजे ह्या(निर्लज्ज विजय पवारनि)रींीं म ध्ये कितीक मुलींचे सोबत असा अश्लील कृत्य केला आहे?,अणि या सारखे अजून किती(राक्षस विजय पवार)शिक्षणाचे मंदिरात घात लाऊन बसलेले आहेत,आणि बीड जिल्ह्यात कोण कोणत्या शिक्षण ठिकाणी असे अश्लील कृत्य महिला व मुलींसोबत घडत आहे हे पण डखढ द्वारे निष्पन्न करण्याची गरज आज पडली



आहे,भविष्यामध्ये कमित कमी आपल्या बीड जिल्ह्यात अशी घटना कोणासोबत होऊ नये यासाठी या पिसाळ कुत्र्या सारखे नीच कृत्य करणारे विरुद्ध स्पेशल चौकशी करून फास्ट ट्रॅक कोर्टमध्ये,कठोर ते कठोर शिक्षा देणे अत्यंत गरजेचा आहे,तसेच आरोपी विजय पवारकडून शिक्षणाच्या नावाखाली घेतलेली षशशी चे पैसे गोरगरीब पालकांना व विद्यार्थ्यांना लवकर परत मिळाले पाहिजे..

**(कामरान खान,शिवसेना अल्पसंख्याक जिल्हा प्रमुख,बीड)**

## डॉ.सुरेखा गवळी यांची बीड जिल्हा महिला अध्यक्षपदी निवड



माजलगावच्या सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयातील सहशिक्षिका तसेच सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या डॉ.सुरेखा कचरू गवळी यांची ग्राहक रक्षक समिती (भारत सरकार नोंदणीकृत ग्राहक सेवा सामाजिक बहुउद्देशीय संस्था) च्या बीड जिल्हा महिला विभागाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. ही निवड राष्ट्रीय संस्थापक अध्यक्षा डॉ.आशा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व राष्ट्रीय मार्गदर्शक दिलीप फडोळ, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नवनाथ धनवटे यांच्या सहमतीने झाली आहे. सदर निवडीची अधिकृत घोषणा नाशिक येथून ऑनलाईन पद्धतीने करण्यात आली असून, निवडीचे पत्र देखील पाठवण्यात आले आहे. या निवडीबद्दल विविध राष्ट्रीय व राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांनी डॉ. सुरेखा गवळी यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. ही निवड सामाजिक कार्यातील त्यांचं योगदान ओळखून करण्यात आल्याने बीड जिल्ह्यातून व माजलगाव तालुक्यातून त्यांचे सर्वत्र स्वागत व अभिनंदन होत आहे.



नवगण राजुरी: श्री क्षेत्र नारायणगडाचा पालखी सोहळा आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरकडे प्रस्थान झाला असून गुरुवारी नवगण राजुरी येथे पालखी सोहळ्याचे व महंत शिवाजी महाराज यांचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेताना श्री.गजानन सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन रवींद्र क्षीरसागर ,युवा नेते हेमंत क्षीरसागर आणि ग्रामस्थ.

## एक दिवस समाजासाठी द्या

### बीडमध्ये वक्फ दुरुस्ती कायद्या विरुद्ध निषेध सभा; जिल्हाभरातील मुस्लिम बांधव रहाणार उपस्थित

भाजप सरकारने लोकशाही चा हनन करत असंवैधानिक तत्वाने मंजूर केलेले वक्फ बोर्ड सुधारणा बिलाच्या संपूर्ण देशभरात ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड च्या वतीने आंदोलन सुरू केले आहे याचाच एक भाग म्हणून उद्या रविवारी दि. २९ दुपारी एक वाजता बीड येथे खासबाग नदी जवळ च्या इज्तेमा मैदान येथे एक भव्य जण निषेध सभेचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी जिल्हाभरातील मुस्लिम बांधवांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित रहाण्याचे आवाहन करण्यात आले. या निषेध सभेचे आयोजन ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डा, वक्फ बोर्ड बचाव कमिटी तर्फे आयोजित करण्यात आली असून यावेळी ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल बोर्ड चे अध्यक्ष मौलाना खालीद सैफुल्ला साहब रहमानी हे उपस्थित राहणार आहे व तसेच मौलाना शाह फजलुर राहिम मुजहीद जनरल सचिव मुस्लिम बोर्ड साहब, हजरत मौलाना हल्ली मुल्ला खान कासमी दारूरुल उलूम देऊबंद, मुफ्ती इस्माईल साहब मालेगाव, मुफ्ती मोइजोद्दीन कासमी , मौलाना रफीयोदिन अशरफी , मौलाना मोहम्मद उमरेन महफूज साब रहमानी, सुरजित सिंग खुंगर नेते सिख कम्युनिटी, कासिम रसूल इलियास साहेब, मौलाना मै फुजुर साब, व अनेक मान्यवर




मार्गदर्शन करणार आहेत व बोर्डाच्या बिल मागे घ्यावे अशी प्रमुख मागणी आहे या मागणीसाठी आपण आपलाही सहभाग नोंदवावा व आपण या सभेस हजाराच्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल बोर्ड वक्फ बचाव कमिटी बीड तर्फे करण्यात आले आहे. यासाठी १५ वर्षांच्या पुढील प्रत्येकाने उपस्थित रहाण्याचे आवाहन केले आहे. या शासनाच्या अन्यायकारक भूमिके विरोधात सर्वांनी उभे राहिचे असल्याने उद्याच्या निषेध सभेला उपस्थित राहणे आवश्यक समजावे असे उलेमा आणि समाजातील प्रतिष्ठित नागरीकांकडून आवाहन करण्यात येत आह

# बीड जिल्ह्यातील तीन आंबेडकरवादी योद्ध्यांचा छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाज भूषण पुरस्कार देऊन सन्मान

बीड । प्रतिनिधी अण्णा भाऊ साठे पीपल्स फोर्सचे संस्थापक अध्यक्ष मा. बा.रा. वाघमारे सर यांच्या माध्यमातून आंबेडकरी चळवळीत योगदानाबद्दल महाराष्ट्र ातील ५० मान्यवरांना २६ जून २०२५ रोजी पुरस्कृत करण्यात आले. आंबेडकरवादी योद्ध्यांचा सत्कार आणि भव्य पुरस्कार वितरण सोहळा रुबी हॉटेल नवीन नांदेड सिडको येथे पार पडला. अनेक नामवंत मान्यवरांच्या हस्ते छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाज भूषण पुरस्कार सन्मानपूर्वक देण्यात आला. बीड येथील आझाद क्रांती सेनेचे सेना प्रमुख राजेश घोडे यांना त्यांच्या आंबेडकरवादी चळवळी बद्दल हा पुरस्कार देण्यात आला. महाराष्ट्रामध्ये खरी आंबेडकरी चळवळ चालवणारा ध्येयवेढा तरुण म्हणून ते परिचित आहेत. आंबेडकरवादी चळवळ पुढे घेऊन जाण्यासाठी त्यांनी महाराष्ट्रामध्ये ठिकठिकाणी तरुणांची एक वेगळीच सेना तयार केलेली आहे. या सेनेच्या माध्यमातून मागास, वंचित, अन्याय अत्याचारग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी वेगाने तत्पर असतात. त्यांच्या कार्याचा यथोचित सन्मान नांदेड येथील अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सच्या माध्यमातून करण्यात आला. खऱ्या आंबेडकरवादी योद्धाचा सत्कार झाला अशी चर्चा आज महाराष्ट्रातून उमटत आहे. त्याचप्रमाणे बीड येथील दुसरे सामाजिक कार्यकर्ते माननीय बाबूराव केशवराव गालफाडे सर यांनाही छत्रपती राजश्री शाहू महाराज समाज भूषण पुरस्कार देण्यात आला. बाबुराव गालफाडे सर सध्या केज येथे वास्तव्यास असून दलितांवरील अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी ते नेहमी तत्पर असतात. त्यांच्या माध्यमातून वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात येतात. समाजातील यशवंताचा प्रोत्साहनपर सत्कार



असो, की एखाद्या अडचणीत सापडलेल्या व्यक्तीला मदत करण्याचे कार्य असो, प्रत्येक ठिकाणी त्यांचा हिरीरीने सहभाग असतो. समाजातील अनेक संघटनांचे व पक्षांचे ते सल्लागार म्हणून काम करतात. अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सच्या माध्यमातून छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाज भूषण पुरस्कार देऊन त्यांचाही यथोचित सन्मान करण्यात आला. पुरस्काराचे बीडचे तिसरे मानकरी डॉ. लक्ष्मण वाघमारे यांनाही हा पुरस्कार देण्यात आला. समाजसेवा, शिक्षण, सामाजिक न्याय आणि मानवतावादी विचारांद्वारे आपल्या कार्याचा ठसा उमटवणारे महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते आणि श्रमिक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष सन्माननीय डॉ.लक्ष्मण मरीबा वाघमारे यांना हा गौरव केवळ एका व्यक्तीचा नव्हे, तर संपूर्ण समाजाचा, कुटुंबाचा आणि महाराष्ट्र ाच्या सामाजिक चळवळीचा सन्मान असल्याचे मत अनेक मान्यवरांनी व्यक्त केले. हा सन्मान म्हणजे डॉ. वाघमारे यांच्या दीर्घकालीन सातत्यपूर्ण कार्याचा प्रामाणिकपणाचा, सामाजिक बांधिलकीचा आणि शिक्षण व ज्ञान क्षेत्रातील भरीव योगदानाचा सन्मान होय. या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून पँथर चळवळीचे नेते रमेशभाई खंडागळे, उद्घाटक म्हणून सामाजिक बांधिलकीचे जाणकार बालाजी नवघरे शिरसिकर, स्वागत अध्यक्ष म्हणून भीम कायदा संघटना जिल्हाध्यक्ष विलास गजभरे, बबन इंगोले अमरावती, शेख शकिला बानो, चंद्रभाऊ ठाकरे सामाजिक कार्यकर्ते नागपूर, कार्याध्यक्ष म्हणून अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्स चे संस्थापक अध्यक्ष बा.रा.वाघमारे यांच्या उपस्थितीमध्ये हा पुरस्कार वितरणाचा सोहळा पार पडला. अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सचे संस्थापक बा.रा वाघमारे मातंग समाजातील एक अभ्यासू व त्यागी नेते आहेत. कांशीराम यांचे कार्य ते पुढे नेत आहेत. मातंग समाजासह सर्व बहुजन बांधवांना संघटित करण्यासाठी ते अहोरात्र कष्ट घेत आहेत. नवीन नांदेड सिडको येथे छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त विदर्भ आणि मराठवाड्यातील काही निवडक बुद्धिजीवी व आंबेडकरवादी कार्यकर्त्यांना छत्रपती राजश्री शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले त्याप्रसंगी अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सचे संस्थापक अध्यक्ष बा.रा वाघमारे यांनी जी काही भूमिका आपल्या भाषणातून मांडलेली भूमिका निश्चित समाधानकारक व सर्वांच्या हिताची होती, म्हणून समाज बांधवांनी बा.रा वाघमारे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे, असे मत प्रतिक्रिया देताना आरंभ वृत्तपत्राचे प्रतिनिधी पी.डी. कसबे यांचेकडे व्यक्त केले.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com